६) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक - टीईएम - २०१८ / प्र. क्र. ३५ / तांशि-४, दिनांक ३१ / ०३ / २०१८.

७) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- अविवि-२०१७ / प्र क्र ४ /का-९ दिनांक १०/०१/२०१७.

**प्रस्तावना:-**

राज्यातील मुस्लीम, बौध्द, खिश्चन, जैन, शीख, पारसी व यहूदी / ज्यू या अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता राज्य शासनाद्वारे सन २००८-२००९ पासून शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे.

२. सदर योजनेची व्याप्ती वाढविण्यास व शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्यास व ही योजना सन २०२२-२३ पासून पुढीलप्रमाणे सुधारीत स्वरुपात राबविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

१) या संदर्भात या पूर्वी शासनाने या धोरणाच्या अनुषंगाने निर्गमित केलेल्या सर्व शासन निर्णयातील पुढे नमूद बाबीसंदर्भातील अटी अधिक्रमीत करुन उर्वरित अटी अबाधित ठेवण्यात याव्यात.

१) अभ्यासक्रम:-.

२) अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता पुढील अभ्यासक्रमासाठी सुधारित शिष्यवृत्ती योजना राबविण्यात यावी.

क) मान्यताप्राप्त वैद्यकीय, अर्धवैद्यकीय अभ्यासक्रम, तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडील दि. ७ ऑक्टोंबर २०१७ च्या शासन निर्णयानुसार पात्र ठरविण्यात आलेल्या सर्व अभ्यासक्रमात पूर्णकालिन पदवी / पदविका / पदव्युत्तर पदवीच्या अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता सदर शिष्यवृत्ती योजना लागू राहील.

ख) या शिवाय उच्च व तंत्र विभागाने दि. ७/१०/२०१७ च्या शासन निर्णयानंतर, भविष्यात नव्याने काही अभ्यासक्रम, राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र ठरविल्यास त्या सर्व अभ्यासक्रमामध्ये पूर्ण वेळ शिकत असलेल्या पदवी / पदविका / पदव्युत्तर (पदविका) विद्यार्थ्यांना

K.K.M.C.M. MANWATH
Katruwar Arts R. Kabra Science & B.R.Mantri Com. College

PRINCIPAL
Katruwar Arts R. Kabra Science
& B. R. Mantri Commerce College
MANWATH Dist PARBHANI

ग) राज्यातील कृषी विद्यापीठात पूर्णकालीन पदवी / पदविका/ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता तसेच कला संचालनालयाअंतर्गत असणा-या मान्यताप्राप्त कला महाविद्यालयातील पदवी / पदविका / पदव्युत्तर (पदवी) अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना ही शिष्यवृती योजना लागु राहणार आहे.

२. **शिष्यवृतीची सुधारीत रक्कम :-**

या सुधारीत शिष्यवृती योजनेअंतर्गत पात्र अभ्यासक्रमाकरिता प्रत्यक्ष शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क किंवा रू ५० हजार या पैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम शिष्यवृती म्हणून विद्यार्थ्यांस अदा करण्यात येईल. त्याचप्रमाणे १२ वी नंतर उच्च शिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या आर्टस्, कॉमर्स, सायन्स या अव्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यांची एकत्रित रक्कम किंवा रू ५,००० या पैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम शिष्यवृती म्हणून विद्यार्थ्यांस देय होईल.

३. **शिष्यवृतीच्या रक्कमेचे वाटप :-**

१) संबंधीत अभ्यासक्रमासाठी येणारे प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक व परीक्षा शुल्काची वरील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे अनुज्ञेय ठरणारी रक्कम वर्षातून दोन हप्त्यात, म्हणजे ऑक्टोबर अखेर व फेब्रुवारी अखेर पर्यंत विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात महाराष्ट्र शासनाच्या "DBT Portal" द्वारे थेट जमा केली जाईल. शिष्यवृती लाभाच्या दुसऱ्या हप्त्यासाठी लगतपूर्वीच्या सत्रातील विद्यार्थ्यांची किमान ५० टक्के इतकी उपस्थिती व लगतपूर्वीच्या सत्र परीक्षेस बसणे आवश्यक असेल. तथापि प्रथम सत्रामध्ये देण्यात येणाऱ्या शिष्यवृतीच्या पहिल्या हप्त्याच्या रकमेसाठी विद्यार्थ्यांची किमान उपस्थिती व परीक्षेबाबतची माहिती विचारात घेण्यात येणार नाही. परंतु त्यापुढील सर्व सत्राकरिता उर्वरित शिष्यवृतीची रक्कम अदा करण्यापूर्वी त्या विद्यार्थ्यांची लगतपूर्वीच्या सत्रातील किमान ५० टक्के इतकी उपस्थिती व लगतपूर्वीच्या सत्र परीक्षेस बसणे आवश्यक राहिल. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नंबर, बँक खात्याशी संलग्नीत असणे व बँक खाते चालू स्थितीत असणे आवश्यक आहे. त्याबाबतची सर्व जबाबदारी ही विद्यार्थ्यांची राहील.

२) ज्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यास शिष्यवृती दिली जाणार आहे तो अभ्यासक्रम जितक्या वर्षाकरिता आहे, त्या संपूर्ण कालावधीसाठी पूर्णवेळ, पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या वर्षीची शिष्यवृती रक्कम देय ठरेल. तथापि विद्यार्थ्यांस शिष्यवृतीचा अर्ज सादर करणे बंधनकारक असेल.

सदर प्रयोजनार्थ प्रत्येक योजनेकरीता संबंधित संचालनालय यांनी राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित (Scheduled) बँकेत खाते उघडून त्याद्वारे लाभार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृती, माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने विकसित केलेल्या राज्यस्तरीय महाडीबीटी पोर्टल मार्फत अदा करण्याची कार्यवाही करावी.

४. **विद्यार्थ्यांची पात्रता :-**

अ) मान्यताप्राप्त विविध अभ्यासक्रमांमध्ये सामायिक प्रवेश चाचणीद्वारे (सीईटी) प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र ठरतील. जे विद्यार्थी सामायिक प्रवेश चाचणी (सीईटी) न देता उक्त अभ्यासक्रम शिकत असतील, ते विद्यार्थी देखील या योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरू शकतील.

ब) सदर योजनेचा लाभ हा कुटूंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित असेल.

क) गेल्या शैक्षणिक वर्षात यापुर्वी या योजनेंतर्गत ज्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृती प्रदान करण्यात आली होती, त्या विद्यार्थ्यांपैकी संबंधित अभ्यासक्रमाचे मागील शैक्षणिक वर्ष यशस्वीरित्या पूर्ण करून पुढील

Kasruwar Arts, R. Kabra Science & B.R.Mantri Com. College K.K.M.C.M. MANWATH

PRINCIPAL
Kasruwar Arts R. Kabra Science, & B. R. Mantri Commerce College MANWATH, Dist PARBHANI

वर्षात प्रवेश घेतला आहे असे विद्यार्थी, तसेच चालू शैक्षणिक वर्षात नव्याने प्रवेश घेतलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती योजना लागू असेल आणि त्यांना आर्थिक स्वरूपात सहाय्य करण्यात येईल.

ड) संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई; संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई; संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे; व महासंचालक कृषी शिक्षण संशोधन परिषद पुणे व संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात शिकत असलेले महाराष्ट्र राज्याचे अल्पसंख्याक विद्यार्थी या योजनेसाठी पात्र राहतील.

इ) या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे सर्व स्रोतांद्वारे मिळणारे वार्षिक उत्पन्न रू ८.०० लक्ष वा त्यापेक्षा कमी असेल असे विद्यार्थी या योजनेसाठी पात्र राहतील.

ई) तसेच १२ वी नंतर कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिकत असलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनी त्यांना ठरवून देण्यात आलेल्या वेळापत्रक व कार्यपद्धतीनुसार ते शिकत असलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे अर्ज सादर करावा. तद्नंतर या सुधारीत धोरणानुसार निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र उमेदवारांची निवड संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडून करण्यात येईल.

५. **विद्यार्थ्यांची अपात्रता :-**

क) या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याला अन्य शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन याचा लाभ घेता येणार नाही.

ख) जर एखाद्या विद्यार्थ्याला वैद्यकीय पदवी, पदव्युत्तर या अभ्यासक्रमाच्या त्या वर्षाच्या अंतर्वासिता कालावधीत (Internship period) काही पारिश्रमिक मिळत असेल किंवा इतर अभ्यासक्रमांच्या बाबतीत प्रायोगिक प्रशिक्षणाच्या (Practical Training) कालावधीत काही भत्ता / विद्यावेतन मिळत असेल तर त्या कालावधीत अशा विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती अदा केली जाणार नाही.

ग) संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थी महाराष्ट्र राज्याच्या अधिवासी (Domicile) असावा व त्याने माध्यमिक शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण केलेली असावी.

घ) दूरस्थ माध्यम / पत्रव्यवहार माध्यम या द्वारे शिकत असलेले विद्यार्थी व अंशकालिन अभ्यासक्रमात शिकत असलेले विद्यार्थी या योजनेकरिता पात्र राहणार नाहीत.

ङ) संबंधित विद्यार्थ्याने संपाचा अवलंब करणे / संपात सहभागी होणे किंवा स्वतःच्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करीत नसल्याबाबत, संबंधित प्राधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमितपणे गैरहजर राहणे इत्यादी स्वरूपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने गैरहजेरी मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले तर अशा विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती थांबविण्यात किंवा रद्द करण्यात येईल अथवा प्राधिकारी उचित समजतील अशा कालावधीपर्यंत रोखून धरण्यात येईल.

छ) जर एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे शिष्यवृत्ती मिळविली असल्याचे निदर्शनास आल्यास त्या विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व त्यास प्रदान करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या रकमेची वसुली करण्यात येईल. तसेच अशा विद्यार्थ्याचे नाव काळ्या यादीत टाकले जाईल व कोणत्याही योजनेंतर्गत शिष्यवृत्ती मिळण्यास अशा विद्यार्थ्यांस प्रतिबंधित केले जाईल.

ज) अभ्यासक्रमाच्या ज्या वर्षाकरिता शिष्यवृत्तीधारकास शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे, त्या वर्षामध्ये अभ्यासक्रम शिष्यवृत्तीधारकाने मध्येच सोडला तर अशा विद्यार्थ्यास प्रदान केलेल्या शिष्यवृत्तीची रक्कम राज्य शासनास योग्य वाटल्यास त्याच्या / तिच्याकडून वसूल केली जाईल.

K.K.M.C.M. MANWATH

PRINCIPAL
Katruwar Arts R. Kabra Science,
& B. R. Mantri Commerce College
MANWATH Dist. PARBHANI

६. **अर्जाची उपलब्धता:-**

या संदर्भात संबंधित नोडल अधिका-यांनी कोणत्या संकेतस्थळावर अर्ज उपलब्ध होईल याबाबत संबंधित महाविद्यालयांना विहीत कालावधीत कार्यपद्धतीसह वेळापत्रक उपलब्ध करून द्यावे.

७. **समन्वय अधिकारी:-**

या शिष्यवृत्तीच्या योजनेकरिता खालील अधिकारी त्यांच्या अंतर्गत चालवणा-या संस्था व आभ्यासक्रमासाठी नोडल अधिकारी म्हणून काम पहातील.

१) संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) महासंचालक कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.
५) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई.

शिष्यवृतीची रक्कम, संबंधित नोडल अधिका-यांमार्फत पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नीत बँक खात्यात महाराष्ट्र शासनाच्या "DBT Portal" द्वारे थेट जमा केली जाईल.

या योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेल्या शिष्यवृत्तींची अल्पसंख्यांक विकास विभागाकडून किंवा विभागाने प्राधिकृत केलेल्या अन्य प्राधिकरणाकडून वेळोवेळी तपासणी करण्यात येईल. या योजनेच्या अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी संबंधित नोडल अधिका-यांवर राहील. तसेच या योजनेबाबत संबंधित नोडल अधिका-यांनी आपल्या अधिनस्त सर्व शिक्षण संस्थांना अवगत करावे.

८. **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे.**

१) विद्यार्थ्यांनी या योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या DBT PORTAL वर येणा-या सूचनांचे पालन करून Online पद्धतीने अर्ज भरावेत.

२) अधिवास प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत.

३) विद्यार्थ्याने शालांत परीक्षा व त्यापुढील परीक्षांमध्ये प्राप्त केलेले गुण दर्शविणा-या गुणपत्रिकांच्या साक्षांकित प्रती. सदरच्या प्रती विद्यार्थ्यांनी स्वतः साक्षांकीत कराव्यात.

४) विद्यार्थी ज्या शैक्षणिक वर्षाच्या शिष्यवृती साठी अर्ज करीत आहे त्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या वर्षाच्या उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. विद्यार्थ्यांचे पालक आयकर भरत असल्यास आयकर विवरणपत्राची सत्यप्रत देखील उत्पन्नाचा दाखला म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. उत्पन्नाचा दाखला नसलेल्या पालकांनी उत्पन्नाचे प्रतिज्ञापत्र को-या पेपरवर स्वयंप्रमाणित (Self-Certified) प्रमाणपत्र स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे (प्रतिज्ञापत्राचा मसुदा सोबत जोडला आहे).

५) विद्यार्थ्याने महाविद्यालयात / शिक्षण संस्थेत प्रवेश घेते वेळी शिक्षणशुल्काची रक्कम भरणा केली असल्यास त्या पावतीची साक्षांकीत प्रत.

९. **लाभाच्या पात्रतेसाठी इतर अटी व शर्ती:-**

१. सदर योजनेचा लाभ हा शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व त्यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे व सध्या विविध शैक्षणिक सत्रात शिकत आहेत अशा महाराष्ट्रातील अधिवासधारक व वादग्रस्त महाराष्ट्र-कर्नाटक सीमा क्षेत्रातील विद्यार्थ्यांसह जे विद्यार्थी विविध अटी व शर्तींची पूर्तता करतील अशा सर्व पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून पुढे लाभ अनुज्ञेय असेल. यानुसार योजनेची अंमलबजावणी सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी व त्यांच्या अखत्यारितील संचालनालयांनी करावी तसेच सदर योजनेची अंमलबजावणी

Kanruwar Arts, R. Kabra Science & B.R.Mantri Com. College
K.K.M.C.M.
MANWATH

PRINCIPAL
Kanruwar Arts R. Kabra Science,
& B. R. Mantri Commerce College
MANWATH, Dist. PARBHANI

महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑन-लाईन पद्धतीने करण्यासाठी - (१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई. (२) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई. (३) संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) , पुणे -४११००१ या नोडल अधिकाऱ्यांकडून यापूर्वीही करण्यात येत होती व यापुढेही उक्त नोडल अधिकाऱ्याकडून त्यांच्या अखत्यारितील अभ्यासक्रमांसाठी लागू असलेल्या शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी करण्यात येईल तसेच संचालक, कला संचालनालय, मुंबई व संचालक, कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी लागू असलेल्या शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणीसाठी नोडल अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

२.तसेच सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र प्रत्येक इच्छुक लाभार्थ्यांने अर्जासमवेत सादर करणे आवश्यक असेल व ते अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

३.सदर प्रयोजनार्थ लाभाकरिता दरवर्षी अर्ज करताना त्यासंबंधीत शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे उत्पन्न विचारात घेऊन किमान संबंधित तहसिलदार अथवा सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. संबंधित तहसिलदार अथवा सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र पालकांच्या प्रत्यक्ष उत्पन्नापेक्षा कमी आढळून आल्यास / बोगस आढळून आल्यास सदर प्रमाणपत्र निर्गमित करणारे अधिकारी, संबंधित विद्यार्थी आणि पालकांविरूध्द फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल.

४.सक्षम प्राधिकाऱ्याकडून संबंधीत विद्यार्थ्यास कुटुंबाच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र देताना त्या विद्यार्थ्याच्या पालकांचे (आई व वडील यांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न विचारात घ्यावे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे आई, वडील (पालक) हयात नसल्यामुळे उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्यास अडचण असल्यास उत्पन्न प्रमाणपत्राऐवजी संबंधीत शैक्षणिक संस्थांनी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची तपासणी करून त्याप्रमाणे पात्रतेकरीता प्रमाणित करून योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांस सर्व कागदपत्रांसह शिफारस करावी. अशा प्रकारे प्राप्त शिफारशींच्या आधारे प्रकरणनिहाय तपासणी करून योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याने अशा अनाथ विद्यार्थ्यांना योजनेच्या पात्रतेसाठी प्रमाणपत्र द्यावे.

५. तसेच लाभाकरिता अनुज्ञेय असलेला अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची व संबंधित सक्षम संस्थांची (AICTE /PCI/COA/MCI/NCTE, विद्यापीठ / शिक्षण मंडळ इत्यादी) पूर्वमान्यता व संलग्नता असणे आवश्यक असेल.

६. केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ कोणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल.

७. सदर योजनेच्या लाभाकरीता शासकीय अथवा अनुदानित शैक्षणिक संस्था किंवा शासकीय विद्यापीठ यांचेबाबतीत शासनाने निर्धारित केलेली व अन्य सर्व खाजगी अंशतः अनुदानित (टप्पा अनुदानावरील) व कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांच्याबाबतीत संबंधित अधिनियमातील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकरणाने प्रत्येक वर्षी निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काची रक्कम, उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडील क्र. टीईएम-२०१६ / प्र. क्र. ५५१ / तांशि-४, दिनांक १५/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या पद्धतीनुसार पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल. या सुधारीत शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अभ्यासक्रमाकरिता सक्षम प्राधिकरणाने निश्चित केलेल्या प्रत्यक्ष शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क किंवा रू. ५० हजार या पैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम शिष्यवृत्ती म्हणून विद्यार्थ्यांस अदा करण्यात येईल. त्याचप्रमाणे १२ वी नंतर उच्च शिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या आर्टस्, कॉमर्स, सायन्स या अव्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यांची एकत्रित रक्कम किंवा रू ५,००० या पैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम शिष्यवृत्ती म्हणून विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल.

K.K.M.C.M. MANWATH

PRINCIPAL
Kalikawar Arts R. Kabra Science
& B. R. Mantri Commerce College
MANWATH Dist. PARBHANI

८. सदर योजनांतर्गत लाभ घेण्यासाठी संबंधित शैक्षणिक वर्षात इच्छुक अर्जदार विद्यार्थ्यांची प्रवेशित अभ्यासक्रमासाठी **किमान ५० टक्के** उपस्थिती आवश्यक असून सदरची उपस्थिती ही आधारसंलग्नित बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीवर विद्यार्थ्यांनी नोंदविणे आवश्यक असेल. तथापि, संबंधित विद्यापीठ / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ / महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या प्रचलित नियमानुसार त्यांनी परीक्षांसारख्या अन्य विविध प्रयोजनार्थ विहित केलेल्या उपस्थितीच्या प्रमाणाची स्वतंत्रपणे सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी पूर्तता करणे आवश्यक असेल. तथापि प्रथम सत्रामध्ये देण्यात येणाऱ्या शिष्यवृतीच्या पहिल्या हप्त्याच्या रकमेसाठी विद्यार्थ्यांची किमान उपस्थिती व परीक्षेबाबतची माहिती विचारात घेण्यात येऊ नये. परंतु त्यापुढील सर्व सत्रांकरिता उर्वरित शिष्यवृतीची रक्कम अदा करण्यापूर्वी त्या विद्यार्थ्यांची लगतपूर्वीच्या सत्रातील किमान ५० टक्के इतकी उपस्थिती व लगतपूर्वीच्या सत्र परीक्षेस बसला असल्याची खात्री करणे आवश्यक असेल.

९. अर्जदार विद्यार्थ्यास प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परीक्षा देणे आवश्यक राहील. केवळ विशिष्ट परिस्थितीत विशेषत: आजारपणाच्या कारणास्तव परीक्षा देणे शक्य झाले नसल्यास तसे विद्यार्थी व शैक्षणिक संस्थेने शिफारस केल्यानंतर संबंधित प्रशासकीय विभागाच्या अखत्यारितील उपसंचालक / सहसंचालक वा सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील.

१०. पात्र लाभार्थी विद्यार्थ्याने अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतल्यानंतर एखाद्या सत्राची (सेमिस्टरची) परीक्षा दिली नसल्यास अथवा एखाद्या शैक्षणिक वर्षात अनुतीर्ण झाल्याने त्या वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास पुढील वर्षाकरीता या योजनेंतर्गत सदर विद्यार्थी लाभ मिळण्यास अपात्र राहील. तथापि, तद्नंतर पुनश्च: त्या सत्रात / वर्षात परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अथवा अंशत: उत्तीर्ण (ATKT) झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाल्यास सदर योजनेतील लाभासाठी पुन्हा पात्र ठरेल.

११. परंतु असे पात्र लाभार्थी विद्यार्थ्याने अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकुण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा पूर्णत: अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास संबंधित विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेंतर्गत लाभाकरीता कायमस्वरूपी अपात्र ठरेल.

१२. संबंधित विद्यार्थी स्वत:च्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करीत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमित असणे अथवा गैरहजर राहणे इत्यादी स्वरूपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्यांची शुल्क शिष्यवृत्ती थांबविण्यात किंवा रद्द करण्यात येईल.

१३. ज्या अभ्याक्रमाकरिता पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांस शिष्यवृती प्रदान करण्यात आली आहे तो अभ्यासक्रम संबंधित विद्यार्थ्याने मध्येच सोडला तर अशा विद्यार्थ्यास प्रदान केलेल्या शिष्यवृतीची रक्कम राज्य शासनास योग्य वाटल्यास त्याच्या / तिच्याकडून वसुल केली जाईल.

१४. लाभार्थी विद्यार्थी व संबंधित शिक्षण संस्था यांनी सदर योजनेतर्गत लाभ घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जात चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर केल्यास त्यास उर्वरित अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी लाभ देण्यात येणार नाही. तसेच, त्या विद्यार्थ्याला / संस्थेला त्यांनी सादर केलेल्या चूकीच्या माहितीच्या आधारे त्यापूर्वी मिळालेल्या लाभाच्या संपूर्ण रकमेची व्याजासह वसूली करण्यात येईल व कोणत्याही अन्य योजनेंतर्गत संबंधित विद्यार्थ्यास लाभ मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल. या संदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची असेल.

१५ सदर योजनेमध्ये व त्याच्या अंमलबजावणीबाबत कोणतीही पुर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व असे बदल केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान

Kathwar Arts S. R. Kabra Science & B.R. Mantri Com. College K.K.M.C.M. MANWATH

PRINCIPAL
Katruwar Arts R. Kabra Science,
& B. R. Mantri Commerce College
MANWATH Dist PARBHANI

झाल्याबाबतचा दावा कोणत्याही विद्यार्थ्यास किंवा शैक्षणिक संस्थेस अथवा विद्यार्थ्यांच्या पालकांना शासनाच्या विरूद्ध करता येणार नाही.

या योजनेची जाहिरात व प्रसिद्धी "अल्पसंख्याकांच्या समस्यांबाबत संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिद्धी" या योजनेमध्ये व इतर बाबींसाठी राखून ठेवलेल्या तरतुदीतून तसेच या योजनेची प्रभावीपणे पारदर्शी अंमलबजावणी करण्यासाठी योजनेची प्रसिद्धी, प्रवासखर्च, आवश्यक असणारी यंत्रसामग्री (संगणक / प्रिंटर, फर्निचर इत्यादी) डीबीटी पोर्टलद्वारे योजना राबविण्यासाठी सेवा देयकाची रक्कम, खाजगी परिरक्षण, इंटरनेट खर्च, टेलीफोन खर्च, स्टेशनरी, न्यायालयीन प्रकरणे, योजनेच्या निधीवाटपाच्या लेखापरीक्षण यासारख्या विविध बाबीकरिता येणारा खर्च भागविण्याकरिता योजना राबविणारा संबंधित नोडल अधिकारी यांना या योजनेसाठी मंजूर करण्यात आलेल्या एकूण निधीपैकी १% रक्कम उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सदरची सुधारित शिष्यवृत्ती योजना मंत्रीमंडळाच्या मान्यतेनंतर लागू करण्यात येत आहे.

सदर योजनेच्या अंमलबजावणीची पूर्ण जबाबदारी संचालक, (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक (तंत्र शिक्षण) तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, महासंचालक, कृषी शिक्षण व संशोधन परीषद, पुणे, संचालक कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची असेल.

सदरहू योजनेच्या अंमलबलजावणी करिता संचालक (वैद्यकीय शिक्षण), संचालक (तंत्र शिक्षण), संचालक (उच्च शिक्षण), संचालक (कला संचालनालय), संचालक (शिक्षण), कुलसचिव, सर्व विद्यापीठे, आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आपल्या अधिपत्याखालील शैक्षणिक संस्थांना अवगत करावे.

या योजनेतंर्गत होणारा खर्च मागणी क्रमांक झेडई-१, मुख्यलेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२ समाजकल्याण २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनातंर्गत योजना (०१) (२०) उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजनेकरिता सहायक अनुदान (२२३५-ए-३३८) या लेखाशीर्षखाली दर्शविण्यात येईल व त्या त्या आर्थिक वर्षात या शीर्षाखाली उपलब्ध तरतुदीतून भागविण्यात येईल.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनौसं- ४१ / २०२२ / व्यय-१, दिनांक ११/०२ / २०२२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२१००४१७५७१४९२१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

SHASHANK
YASHWANT BARVE

(शशांक य. बर्वे)
अवर सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. मंत्री / मा. राज्यमंत्री अल्पसंख्याक विकास यांचे खाजगी सचिव

K.K.M.C.M. MANWATH

PRINCIPAL
Kamruwar Arts R. Kabra Science
& B. R. Mantri Commerce College
MANWATH Dist PARBHANI

४. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद्, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
६. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
८. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
११. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान महालेखापाल १ / २ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
१३. महालेखापाल १ / २ (लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर.
१४. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६. संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
१७. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
१८. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई
१९. सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
२०. अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. निवडनस्ती.

PRINCIPAL
Katruwar Arts R. Kabra Science
& B. R. Mantri Commerce College
MANWATH. Dist. PARBHANI

राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील उच्चशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृतीबाबतची सुधारित शिष्यवृती योजना.

# महाराष्ट्र शासन

अल्पसंख्याक विकास विभाग

शासन शुध्दीपत्रक क्रमांक : अविवि २०२०/प्र.क्र.५०/का-६,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक - २७ मार्च, २०२३

**वाचा:-**

१) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अविवि -२००९ / प्र. क्र. ४६ / ०९ / का-१, दिनांक ५/२/२००९.

२) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक अविवि - २०१० / प्र. क्र. २१२ / ०९ / का.४, दिनांक ३/२/२०१०.

३) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अविवि -२०१० / प्र. क्र. ११२ / १० / का.६, दिनांक २२/०७/२०१०.

४) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अविवि -२०११ / प्र. क्र. ४४ / ११ / का.६, दिनांक १४/१०/२०११.

५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण -२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ७ / १० / २०१७.

६) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक - टीईएम - २०१८ /प्र.क्र.३५/तांशि-४, दिनांक ३१ / ०३ / २०१८.

७) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- अविवि-२०१७ / प्र क्र ४ /का-९ दिनांक १०/०१/२०१७.

८) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक- अविवि-२०२० / प्र क्र ५० /का-६ दिनांक ०४ / १० /२०२२.

**प्रस्तावना:-**

राज्यातील मुस्लीम, बौध्द, खिश्चन, जैन, शिख, पारसी व यहुदी / ज्यू या अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता राज्य शासनाद्वारे सन २००८-२००९ पासून शिष्यवृती योजना राबविण्यात येत आहे.

२. सदर योजनेची व्याप्ती वाढविण्यास व शिष्यवृतीच्या रकमेत वाढ करण्यास व ही योजना सन २०२२-२३ पासून पुढीलप्रमाणे सुधारीत स्वरुपात राबविण्यास उपरोक्त क्र. ८ येथील शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे.

K.K.M.C.M. MANWATH
Katruwar R. Kabra Science & B.R.Mantri Com. College

PRINCIPAL
Katruwar Arts R. Kabra Science & B. R. Mantri Commerce College MANWATH Dist PARBHANI

## शासन शुध्दीपत्रक:-

उपरोक्त क्रं ८ येथील शासन निर्णयात खालील तक्त्यातील "अ" येथे नमूद केलेल्या मुद्दा / अट च्या ऐवजी सदर तक्त्यातील "ब" येथे दर्शविल्यानुसार वाचण्यात यावे.

| "अ" | "ब" |
|---|---|
| शासन निर्णय क्र. अविवि / २०२० / प्र. क्र. ५० / का-६, दि. ०४ / १० / २०२२ मधील अट / मुद्दा | प्रस्तावित सुधारणा |
| **पृष्ठ क्र.२ :: विद्यार्थ्यांची पात्रता अंतर्गत-मुद्दा क्र.ब)**<br>सदर योजनेचा लाभ हा कुटूंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित असेल. | **पृष्ठ क्र.२ :: विद्यार्थ्यांची पात्रता अंतर्गत-मुद्दा क्र.ब)**<br>सदर योजनेचा लाभ हा आर्थिकदृष्टया दुर्बल कुटूंबातील अपत्य संख्येचा विचार न करता कुटूंबातील कोणत्याही दोन पात्र अपत्यांना अनुज्ञेय राहिल. |
| **पृष्ठ क्र.३ :: विद्यार्थ्यांची अपात्रता अंतर्गत-मुद्दा क्र.ग)**<br>संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थी महाराष्ट्र राज्याच्या अधिवासी असावा व त्याने माध्यमिक शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण केलेली असावी . | **पृष्ठ क्र.३ :: विद्यार्थ्यांची अपात्रता अंतर्गत-मुद्दा क्र.ग)**<br>सदर शासन निर्णयातील **पृष्ठ क्र.३** वरील मुद्दा क्रं. ग) हा मुद्दा :: विद्यार्थ्यांची अपात्रता ऐवजी **"विद्यार्थ्यांची पात्रता"** या मथळया अंतर्गत समाविष्ट करुन वाचण्यात यावा. |
| **पृष्ठ क्र.४ :: अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे अंतर्गत मुद्दा क्रं. ४)**<br>विद्यार्थी ज्या शैक्षणिक वर्षाच्या शिष्यवृत्ती साठी अर्ज करीत आहे त्या वर्षाच्या लगत पूर्वीच्या वर्षाच्या उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. विद्यार्थ्यांचे पालक उत्पन्न कर भरत असल्यास आयकर विवरणपत्राची सत्यप्रत देखील उत्पन्नाचा दाखला म्हणून ग्राहय धरण्यात येईल . उत्पन्नाचा दाखला नसलेल्या पालकांनी उत्पन्नांचे प्रतिज्ञापत्र कोऱ्या पेपरवर स्वयंप्रमाणित (Self Certified) प्रमाणपत्र स्वरुपात सादर करणे आवश्यक आहे (प्रतिज्ञा पत्राचा मसुदा सोबत जोडला आहे). | **पृष्ठ क्र.४ :: अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे अंतर्गत मुद्दा क्रं. ४)**<br>विद्यार्थी ज्या शैक्षणिक वर्षाच्या शिष्यवृत्ती साठी अर्ज करीत आहे त्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे उत्पन्न विचारात घेऊन तहसिलदार अथवा सक्षम प्राधिकाऱ्याचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.<br>ज्या विद्यार्थ्यांचे पालक आयकर भरत असतील अशा प्रकरणी पालकांच्या आयकर विवरणपत्राची सत्यप्रत देखील तहसिलदारांच्या स्वाक्षरीच्या उत्पन्नाच्या दाखल्यासोबत जोडणे आवश्यक आहे. |

K.K.M.C.M. MANWATH
Kabra Science & ... Mantri Com. College

PRINCIPAL
Katruwar Arts R. Kabra Science
& B. R. Mantri Commerce College
MANWATH Dist. PARBHANI

| | |
|---|---|
| **पृष्ठ क्र.६ :: लाभाच्या पात्रतेसाठी इतर अटी व शर्ती अंतर्गत मुद्दा क्रं. ८)**<br>सदर योजनांतर्गत लाभ घेण्यासाठी संबंधित शैक्षणिक वर्षात इच्छुक अर्जदार विद्यार्थ्याची प्रवेशित अभ्यासक्रमासाठी किमान ५० टक्के उपस्थिती आवश्यक असून सदरची उपस्थिती ही आधारसंलग्नित बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीवर विद्यार्थ्यांनी नोंदविणे आवश्यक असेल. संबंधित विद्यापीठ / महाराष्ट्र राज्यतंत्रशिक्षण मंडळ / महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या प्रचलित नियमानुसार त्यांनी परीक्षांसारख्या अन्य विविध प्रयोजनार्थ विहित केलेल्या उपस्थितीच्या प्रमाणाची स्वतंत्रपणे सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी पूर्तता करणे आवश्यक असेल. तथापि प्रथम सत्रामध्ये देण्यात येणाऱ्या शिष्यवृतीच्या पहिल्या हप्त्याच्या रकमेसाठी विद्यार्थ्यांची किमान उपस्थिती व परीक्षेबाबतची माहिती विचारात घेण्यात येऊ नये. परंतु त्यापुढील सर्व सत्रांकरिता उर्वरित शिष्यवृतीची रक्कम अदा करण्यापूर्वी त्या विद्यार्थ्याची लगतपूर्वीच्या सत्रातील किमान ५० टक्के इतकी उपस्थिती व लगतपूर्वीच्या सत्र परीक्षेस बसला असल्याची खात्री करणे आवश्यक असेल. | **पृष्ठ क्र.६ :: लाभाच्या पात्रतेसाठी इतर अटी व शर्ती अंतर्गत मुद्दा क्रं. ८)**<br>सदर योजनांतर्गत लाभ घेण्यासाठी संबंधित शैक्षणिक वर्षात इच्छुक अर्जदार विद्यार्थ्याची प्रवेशित अभ्यासक्रमासाठी उपस्थिती बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीवर नोंदविणे अपेक्षित आहे. तथापि ज्या शैक्षणिक संस्थेत अद्याप बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणाली बसविण्यात आलेली नाही अथवा बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणाली तांत्रीक अथवा अन्य कारणामुळे नादुरूस्त असल्यास संस्थेने विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रचलित कार्यपद्धतीनुसार नोंदविणे आवश्यक राहील. |
| **पृष्ठ क्र.६ :: लाभाच्या पात्रतेसाठी इतर अटी व शर्ती अंतर्गत मुद्दा क्रं. ११)**<br>परंतु असे पात्र लाभार्थी विद्यार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णतः अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास संबंधित विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेतंर्गत लाभाकरीता कायमस्वरूपी अपात्र ठरेल . | **पृष्ठ क्र.६ :: लाभाच्या पात्रतेसाठी इतर अटी व शर्ती अंतर्गत मुद्दा क्रं. ११)**<br>परंतु असे पात्र लाभार्थी विद्यार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णत : अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास संबंधित विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेतंर्गत लाभाकरीता कायमस्वरूपी अपात्र ठरेल आणि सदरची अट, पूर्वलक्षी प्रभावाने लागू न करता ती शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विविध विहित अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षात / थेट द्वितीय वर्षात नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहील. |

K.K.M.C.M.
MANWATH
Kattruwar Arts R. Kabra Science & B.R.Mantri Com. College

PRINCIPAL
Kattruwar Arts R. Kabra Science
& B. R. Mantri Commerce College
MANWATH Dist. PARBHANI

उपरोक्त तक्त्यातील "ब" येथे दर्शविलेल्या प्रशासकीय सुधारणांव्यतिरिक्त या शासन निर्णयात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२३०३२७२०१०१७९४१४ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

SHASHANK YASHWANT BARVE

(शशांक य. बर्वे)

अवर सचिव

अल्पसंख्याक विकास विभाग

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री / मा. राज्यमंत्री अल्पसंख्याक विकास यांचे खाजगी सचिव
४. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
६. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधापमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
८. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.प्रधान सचिव, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
११.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.प्रधान महालेखापाल १ / २ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
१३.महालेखापाल १ / २ (लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर.
१४.अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
१५.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६.संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
१७.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
१८. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई
१९.सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०.अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१.निवडनस्ती.

K.K.M.C.M. MANWATH

PRINCIPAL
Kadruwar Arts R. Kabra Science & B. R. Mantri Commerce College
MANWATH Dist PARBHANI